| | **पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**<br>जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर<br>दुरध्वनी – ०२५२५ - २५११००<br>E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com | |
|---|---|---|

**प्रेसनोट क्र. ५१ दिनांक १८/०७/२०२३**

# सफाळा पोलीस ठाणे हद्दितून वाहन चोरी करुन बोईसर येथे सोन्याची चैन जबरीने चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला सफाळा पोलीस ठाणे यांचेकडून अटक

दिनांक १५/०७/२०२३ रोजी एका अज्ञात इसमाने फिर्यादी यांचेकडून फिर्यादीच्या मालकीची स्कुटी नं. MH.48.CG-9387 ही चहा पिऊन येतो असे खोटे सांगून वर नमूद स्कुटी ही स्वतःच्या फायदयाकरीता लबाडीच्या ईरादयाने मौजे पारगाव गावदेवी मंदीराचे समोर असलेले ओम साई ॲटो सर्व्हीस सेंटरचे समोरुन पारगाव येथून चोरी करुन पळुन गेला म्हणून सफाळा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ६५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे आदेशान्वये श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/अमोल गवळी, प्रभारी अधिकारी, सफाळा पोलीस ठाणे यांनी पोलीस पथक तयार करुन गुन्हेगाराची गुन्हे करण्याची पध्दत तसेच सीसीटिव्ही फुटेज व इतर तांत्रिक व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने दि.१७/०७/२०२३ रोजी आरोपी कमलेश रामानंद गुप्ता, वय ३३ वर्षे, रा. रुम नं.२०४, पियुष मॅजेस्टीक, निर्मलनगर रोड, दिवा (प), जि.ठाणे यास त्याचे राहते पत्यावर जावून रात्रीचा सापळा रचून त्यास ताब्यात घेवून चौकशी केली असता आरोपी याने वरील नमूद स्कुटी घेऊन बोईसर येथे पादचारी महीलेच्या गळयातील १२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचून गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. सदर आरोपीस अटक केलेली असून त्याचेविरुध्द सफाळा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ६५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ अन्वये व बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I २८४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२ अन्वये गुन्हे दाखल करुन त्याचेकडून गुन्हयातील गेला माल ४०,०००/- रुपये किं.ची ॲटॉर्क १२५ स्कुटी क्रमांक MH48 CG9387 स्कुटर व स्कुटरचे डिक्कीमधून ६०,०००/- रुपये किमतीची १२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हस्तगत केलेली आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास हा सपोनि/अमोल गवळी, प्रभारी अधिकारी, सफाळा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

आरोपीचा गुन्हेगारी अभिलेख तपासला असता त्याचेविरुध्द यापुर्वी खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.क्रमांक | कलम |
|---|---|---|---|
| १ | मुंब्रा पोलीस ठाणे | ३१०/२०१७ | भादंविस कलम ४२०,४६८,४६९,४७१, १८८,३४ |
| २ | कोपरखैराणे पोलीस ठाणे | ३३७/२०१९ | भादंविस कलम ३९२,४५२ |
| ३ | रबाळे पोलीस ठाणे | ५१९/२०१९ | भादंविस कलम ३९२,४५१,३४१,५०६ |
| ४ | नालासोपारा पोलीस ठाणे | ५३८/२०२२ | भादंविस कलम ३९४,३२३,५०६ सह आर्म ॲक्ट ३,२५ प्रमाणे |
| ५ | वापी पोलीस ठाणे | ११२/२०२३ | भादंविस कलम ३७९ |
| ६ | मुंब्रा पोलीस ठाणे | २२०/२०२३ | भादंविस कलम ३७९,३४ |
| ७ | मुंब्रा पोलीस ठाणे | २२६/२०२३ | भादंविस कलम ३९२ |
| ८ | मुंब्रा पोलीस ठाणे | २४९/२०२३ | भादंविस कलम ३९२ |
| ९ | मुंब्रा पोलीस ठाणे | २५०/२०२३ | भादंविस कलम ३९२ |
| १० | विष्णुनगर पोलीस ठाणे | ७१/२०२३ | भादंविस कलम ३९४ |
| ११ | नौपाडा पोलीस ठाणे | ८७/२०२३ | भादंविस कलम ३७९ |

सदरची कामगिरी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक पालघर, यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती निता पाडवी, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, सपोनि/अमोल गवळी, प्रभारी अधिकारी, सफाळा पोलीस ठाणे, पोउपनि/मनिकेरी, बोईसर पोलीस ठाणे, पोहवा/८४२ ए.व्ही.खोत, पोहवा/८२० के.बी.शेळके, पोना/२२ व्ही. एन. सातपुते सर्व नेमणूक सफाळा पोलीस ठाणे, पोहवा/४२८ विजय दुबळा, पोशि/८४ मयुर पाटील, पोशि/२८० धिरज साळुंखे, नेमणूक बोईसर पोस्टे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.